**Most Immediate**

Government of India
Department of Atomic Energy
Secretariat Coordination Section

Anushakti Bhavan,
C.S.M marg,
Mumbai – 400 001

No. 16/6/2020-SCS/COVID-19/4090 May 6, 2020

**Circular**

**Subject: Preventive Measures to contain the spread of COVID-19 - Extension of lock down - regarding**

In pursuance to the MHA Order No.40-3/2020-DM-I(A) dated 01.05.2020, circulated vide Department's Circular of even number dated 03.05.2020, regarding new guidelines on lockdown measures which came into effect from 4th May, 2020 for a period of two weeks for strict implementation.

2. In this connection, the Government of Maharashtra vide Notification dated 04.05.2020 (copy enclosed for ready reference) have issued further amendment to para 7(ii)(g) of their earlier Order No. DMU/2020/CR.92/DisM-1 dated 02.05.2020, now limiting attendance to 5% in the Mumbai Metropolitan Region (MMR), Pune Municipal Corporation (PMC), Malegaon Municipal Corporation and Pimpri Chinchwad Municipal Corporation (PCMC).

3. Accordingly, DAE and its Constituent Units / Public Sector Undertakings and Aided Institutions falling within the above-mentioned Regions / Municipal Corporations, shall remain open and functional with the attendance limited to 5% of their total working strength depending upon work exigencies with effect from 04.05.2020 upto 17.05.2020 or until further orders, whichever is earlier. Other instructions of MHA, New Delhi and respective State Governments/Union Territories and this Departments Circulars issued from time to time shall continue to remain in force until such time.

4. This issues with the approval of the Competent Authority in the Department.

Encl: Three pages.

**(Sandeep S. Deokar)**
**Under Secretary (SCS)**

**All Heads of Constituent Units/PSUs/Aided Institutions of DAE**

Copy to:
1. All Administrative Heads of Units/PSUs/Aided Institutions of DAE
2. Under Secretary (Adm.), DAE – For necessary action in respect of DAE Secretariat.
3. Head, CISD, DAE – For uploading the above communication on DAE website
4. All Officers and Sections in DAE Secretariat – through DARPAN
5. Secretary, Staff Side, DAE Departmental Council

**महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉक डाऊनच्या कालावधीतील मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (M.M.R.), पुणे महानगर पालिका (P.M.C.), मालेगाव महानगर पालिका तसेच पिंपरी-चिंचवड महानगर पालिका (P.C.M.C.) यांच्या कार्यक्षेत्रातील राज्य शासकीय कार्यालयातील उपस्थिती व अन्य उपाययोजनांबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : समय 2020/प्र.क्र.35/18(र.व का.)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई 400032
दिनांक : 4 मे, 2020

वाचा:- :

1. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-2020 / प्र. क्र. 35 /18 (र.व का.), दिनांक 18 एप्रिल, 2020,
2. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-2020 / प्र. क्र. 35 /18 (र.व का.), दिनांक 22 एप्रिल, 2020,
3. केंद्रशासनाच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्र. 40-3/2020-डीएम-आय-(ए) दि. 1 मे,2020,
4. शासन अधिसूचना, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनवर्सन, क्रमांक : डीएमयू 2020 / सी आर 92 / डीआयएसएम-1, दिनांक 2 मे, 2020.
5. केंद्रशासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाचे आदेश क्र. 11013/9/2014-ईएसटीटी (ए-III), दि. 29 एप्रिल,2020.

**शासन निर्णय :-**

कोरोना विषाणूंचा (COVID-19) प्रसार राज्य शासकीय कार्यालयांमध्ये होऊ नये, तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये म्हणून विविध प्रतिबंधात्मक उपाय योजना **राबविण्याच्या दृष्टीने या विभागाच्या संदर्भ क्रमांक 1 व 2 येथील शासन निर्णयान्वये विविध सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.**

2. या विभागाच्या संदर्भ क्र. 2 येथील दि. 22 एप्रिल, 2020 च्या शासन निर्णयान्वये, **मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (M.M.R.) तसेच पुणे महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (P.M.R.) यांचे कार्यक्षेत्रातील राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी** यांची कार्यालयीन उपस्थिती 5 टक्के इतकी ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. आता, केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. 3 येथील दिनांक 1 मे, 2020 च्या अधिसूचनेन्वये लॉकडाऊनचा कालावधी दि. 17 मे, 2020 पर्यंत वाढविण्यात आला असून त्या अनुषंगाने मदत व पुनर्वसन विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक 2 मे, 2020 च्या आदेशासोबतच्या मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद 7 (II) (g) मधील सूचना विचारात घेऊन शासकीय कार्यालयातील उपस्थितीबाबत पुढीलप्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत :-

अ) **मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (M.M.R.), पुणे महानगर पालिका (P.M.C.), मालेगाव महानगर पालिका तसेच पिंपरी-चिंचवड महानगर पालिका (P.C.M.C.) यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालयांतील उपस्थिती 5 टक्क्यांपर्यंत ठेवण्यात यावी.**

ब) **याअनुषंगाने रोटेशन पध्दतीने कार्यालयीन उपस्थिती निश्चित करण्यासाठी प्रत्येक मंत्रालयीन सचिव/संबंधित कार्यालयप्रमुख यांनी आवश्यक ती उपाययोजना करावी**

क) **उर्वरित संपूर्ण राज्यातील शासकीय कार्यालयांमधठील उपस्थिती ही मदत व पुनर्वसन विभागाच्या संदर्भ क्रमांक 4 येथील दिनांक 2 मे, 2020 च्या आदेशाप्रमाणे राहील.**

3. त्याचप्रमाणे सर्व राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारा नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांचेसह) यांनी त्यांचे मोबाईल फोनवर **"आरोग्य सेतु ॲप"** तातडीने डाऊनलोड करून घ्यावा. तसेच त्यासंदर्भातील केंद्र शासनाच्या दिनांक 29 एप्रिल, 2020 च्या आदेशामध्ये नमूद करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

4. तसेच राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये कोरोना विषाणूंचा प्रसार रोखण्याच्यादृष्टीने खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

अ) कार्यालयात उपस्थित सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यालयात प्रवेश केल्यापासून ते

कार्यालय सोडेपर्यंतच्या संपूर्ण कालावधीत चेहऱ्यावर मास्क परिधान करणे बंधनकारक राहील.

ब) साबणाचा वापर करून हात वारंवार धुणे तसेच हॅण्ड सॅनिटायझरचा वापर करणे आवश्यक राहील. त्यासाठी लिक्वीड सोप व हॅण्ड सॅनिटायझर पुरेशा प्रमाणात कार्यालयात उपलब्ध असेल, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

क) कार्यालयात काम करतेवेळी सोशल डिस्टंसिंग पाळण्याच्यादृष्टीने दोन व्यक्तींमध्ये किमान तीन फूट अंतर राखावे.

ड) राज्य शासकीय कार्यालयात प्रवेश करणाऱ्या अभ्यागतांनीसुद्धा वरील सूचनांचे पालन करण्याच्यादृष्टीने संबंधित कार्यालय प्रमुखांनी उचित कार्यवाही करावी.

5. उपरोक्त सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

6. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. -------- असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अन्शुं सिन्हा)
सचिव ( प्र.सु.व.र.व.का )

प्रत :

1. मा.राज्यपाल यांचे सचिव (5 प्रती),
2. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
3. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
4. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
5. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
6. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव(5 प्रती), मंत्रालय, मुंबई 400032,
7. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई 400032,
8. सर्व मा.मंत्री / मा. राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई 400032,
9. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई 400032,
10. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य ,
11. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई 400032,
12. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
13. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
14. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,
15. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
16. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
17. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
18. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
19. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
20. सर्व विभागीय आयुक्त,
21. आयुक्त, सर्व महानगर पालिका,
22. व्यवस्थापकीय संचालक, BEST महामंडळ, मुंबई
23. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, (MSRTC), मुंबई ,
24. सर्व जिल्हाधिकारी,
25. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
26. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
27. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (5 प्रती ),
28. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.1, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई 400020,
29. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-400025,
30. नॅशनलीस्ट कॉंग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई 400038,
31. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-400028,
32. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य , बी.एस.जी.भवन, प्लॉट नं. 83-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-400014,
33. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, 314, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई 400004,

34. भारतीय कम्युनिस्ट(मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई 400013,
35. महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई 400028,
36. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई 400032
37. निवड नस्ती (का.18), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई400032.